**जिल्हा परिषद/पंचायत समिती व ग्रामपंचायत सार्वत्रिक/पोट निवडणूकांसाठी अनुदान वितरणाचे निकष ठरविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५६/ई-९३४६२४/पंरा-२**
**बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१**
**दिनांक: २९ सप्टेंबर ,२०२५**

वाचा :-१. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२६५/पं.रा.२,दिनांक १४ जून, २०१६

२. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.जिपनि-२०१७/प्र.क्र.३२/पं.रा.२, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१८

३.राज्य निवडणूक आयोगाचे क्र:रानिआ/ग्रापंनि-२०२३/सं.क्र.२९३/का.८, दि.२६.१०.२०२३ चे पत्र.

४.राज्य निवडणूक आयोगाचे क्र:रानिआ/जिपपंस-२०२३/प्र.क्र.०७/का.७,दि. २६.१०.२०२३ चे पत्र.

५.शासन निर्णय, क्रमांक:संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५६/पं.रा.२, दिनांक ३० मे, २०२४

६.अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांचे क्रमांक:कक्ष-२/१/ग्रामप/ई-१९५५००१/२०२५, दिनांक २९/०५/२०२५ चे पत्र.

७.राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का-५, दिनांक २९ ऑगष्ट, २०२५,

**प्रस्तावना :-**

राज्यातील जिल्हा परिषद/पंचायत समिती व ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक/पोट निवडणूका राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी राज्य शासनामार्फत अर्थसंकल्पिय तरतूदीमधून जिल्हाधिकारी यांना अनुदान वितरित करण्यात येते. या अनुदानातून जिल्हाधिकारी निवडणूकांवरील खर्च भागवितात. मतदान केंद्रावर आवश्यक मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, स्टेशनरी, निवडणूक साहित्य व इतर आवश्यक अनुषंगिक खर्चासाठी अनुदान उपलब्ध करुन देणे आवश्यक असून निवडणूकीत मतदान केंद्राच्या संख्येनुसार मतदान अधिकारी व कर्मचारी यांना द्यावयाचे मतदान भत्ता/मानधन यात वाढ होते. तसेच मतदान केंद्राच्या संख्येनुसार साहित्य व वाहतुकीसाठीच्या खर्चामध्ये देखील वाढ होते. जिल्हा परिषद/पंचायत समिती निवडणूकीसाठी “प्रति मतदार”तसेच ग्रामपंचायत निवडणूकीसाठी “प्रति ग्रामपंचायत” **ऐवजी** “प्रति मतदान केंद्र” अनुदान वितरित करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधीन क्रमांक ३ व ४ येथील पत्रान्वये कळविले आहे. त्याअनुषंगाने विभागाने जिल्हा परिषद/पंचायत समिती व ग्रामपंचायत या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांकरिता उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या अनुदानामध्ये सुधारणा करण्यासाठी एक निश्चित धोरण ठरविण्यासाठी संदर्भाधीन क्रमांक ५ येथील शासन

निर्णयान्वये प्रधान सचिव, ग्रामविकास यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशी तसेच राज्य निवडणूक आयोगाने कळविल्यानुसार जिल्हा परिषद/पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत निवडणूकांसाठी जिल्हाधिकारी यांना अनुक्रमे "प्रति मतदार" तसेच "प्रति ग्रामपंचायत" ऐवजी "प्रति मतदान केंद्र" वितरित करण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रक्कमेत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती..

**शासन निर्णय:-**

राज्यातील जिल्हा परिषद/पंचायत समिती तसेच ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणूकांच्या अनुदानाबाबत निर्गमित करण्यात आलेले वाचा येथील क्रमांक १ व २ चे शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहेत. आता, हा शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून पुढील आदेशापर्यंत आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद/पंचायत समिती सार्वत्रिक/पोट निवडणूकांसाठी "प्रति मतदार" तसेच ग्रामपंचायत सार्वत्रिक/पोट निवडणूकांसाठी "प्रति ग्रामपंचायत" **ऐवजी** जिल्हाधिकारी यांना खालीलप्रमाणे "प्रति मतदान केंद्र" अनुदान वितरित करण्यात येईल.

**(अ) जिल्हा परिषद/पंचायत समिती सार्वत्रिक/पोट निवडणूकांकरिता अनुज्ञेय अनुदान**

| अ. क्र. | स्थानिक स्वराज्य संस्थाचे नांव | प्रभाग पध्दती | एका मतदान केंद्रावर जोडावयाच्या मतदारांची कमाल संख्या | प्रति मतदान केंद्र उपलब्ध करुन देण्यात येणारे अनुदान (रक्कम रुपयांमध्ये) |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद/पंचायत समिती | एकत्र निवडणूक | १००० ते १२०० | ७२,०००/- |
| | | स्वतंत्र निवडणूक | | |

**(ब) ग्रामपंचायत सार्वत्रिक/पोट निवडणूकांकरिता अनुज्ञेय अनुदान**

| अ. क्र. | स्थानिक स्वराज्य संस्थाचे नांव | प्रभाग पध्दती | एका मतदान केंद्रावर जोडावयाच्या मतदारांची कमाल संख्या | प्रति मतदान केंद्र उपलब्ध करुन देण्यात येणारे अनुदान (रक्कम रुपयांमध्ये) |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत | बहुसदस्यीय | ८०० ते १००० | ३१,२५०/- |
| | | बहुसदस्यीय (थेट सरपंचासह) | | |

१) उपरोक्त (अ) व (ब) मध्ये नमूद केल्यानुसार जिल्हा परिषद/पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत सार्वत्रिक व पोट निवडणूकांकरिता "प्रति मतदान केंद्र" अनुज्ञेय होणारे अनुदान अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे संबंधित जिल्हाधिकारी यांना वितरित करण्यात येईल.

२) अनावश्यक व टाळता येण्यासारखा खर्च झाला नाही याची खात्री करुन जिल्हाधिकारी यांनी प्रमाणित केल्यानंतर सदर अनुदान शासनाकडून वितरित करण्यात येईल.

३) शासनामार्फत वितरित करण्यात येणारे अनुदान हे शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन असेल.

४) राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या कार्यक्रमानुसार निवडणूका पार पडल्यानंतर राज्य निवडणूक आयोगास सादर करावयाच्या नमूना १-अ सोबतच्या विवरणपत्रामध्ये नमूद बाबींवरच सदर अनुदान खर्च होईल याची दक्षता घेण्यात यावी.

५) मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च होणार नाही व कोणतीही अनियमितता घडणार नाही, तसेच निकषांपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

६) जिल्ह्यातील कमी-जास्त मतदार संख्येच्या मतदान केंद्राचा खर्च भागविण्यासाठी या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय केलेल्या अनुदान रक्कमेच्या मर्यादेत अनुदान विभागून देण्यासाठी जिल्हाधिकारी हे सक्षम प्राधिकारी राहतील.

७) अखर्चित राहिलेले अनुदान अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर (बी.डी.एस.) द्वारे दिनांक ३१ मार्च पूर्वी शासनास समर्पित करण्याची दक्षता घेण्यात यावी.

८) जिल्हा परिषद/पंचायत समिती सार्वत्रिक/पोट निवडणूकांवरील अनुदान हे "मागणी क्र.एल-२, (०२)(०१) जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या निवडणूकांसंबंधातील खर्च (अनिवार्य), १३-कार्यालयीन खर्च (२०५३ ०५२९) (१३)" या लेखाशिर्षाखाली अनुज्ञेय असेल.

९) ग्रामपंचायत सार्वत्रिक/पोट निवडणूकांवरील अनुदान हे "क्र. एल-२, (०४) (०१) ग्रामपंचायतींच्या व विभागीय ग्रामपंचायत मंडळाच्या निवडणूकासंबंधातील खर्च (अनिवार्य), १३-कार्यालयीन खर्च, (२०५३ ०५४७ (१३)" या लेखाशिर्षाखाली अनुज्ञेय असेल.

१०) सदर शासन निर्णय, वित्त विभागाचा अनौ. सं.क्र. ५१३/व्यय-१५, दिनांक १८ जुलै, २०२५ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

११) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर www.maharashtra.gov.in उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक **202509291113440820** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

BABURAO MAHADU ASOLE

Digitally signed by BABURAO MAHADU ASOLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=dd67f0d38c29ae85f8559e65d2f9d423f04fabb3383af844cc7c057d58b4167a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EEFD6CD19B53F91B65DAD89AA72A32B839329DB6184B40A0F533230BD96705E, cn=BABURAO MAHADU ASOLE
Date: 2025.09.29 12:57:13 +05'30'

(बा. म. आसोले)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव.
४. मा. मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव.
५. मा. राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव.

६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई-३२.
१०. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/ नागपूर.
११. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर.
१२.सर्व विभागीय आयुक्त.
१३. सर्व जिल्हाधिकारी, (जिल्हाधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१५. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई (दोन प्रती).
१६. वित्त विभाग (व्यय-१५), मंत्रालय, मुंबई.
१७. ग्राम विकास विभाग, कार्यासन क्रमांक वित्त-१, वित्त-७ व वित्त-८.
१८. कार्यासन पंचायत राज-२ (निवडनस्ती)